# भरतनाट्यम प्रवेशिका प्रथम

एकूण गुण - ७५ न्यूनतम उत्तीर्ण गुण – २६

क्रियात्मक – ६0 मौखिक - गुण - १५

**अभ्यासक्रम** -

1. अडवू:
    a. शिखर (तत् तै ता हा, धित् तै ता)
    b. सरक (तै कत् तै हि)
    c. पेरी (तै कत् तै हि)
    d. तिर्माणम् (तरि किट तोम्)
    e. मंडी (तत् तै ता त दित् ता)
    f. तट्टी मेट्टी (५ जाति)
2. संयुक्त हस्त, दृष्टीभेद, ग्रीवाभेद, स्थानकमंडलभेद, हस्तप्रचार
3. विनियोग- पताक, त्रिपताक, अंजली, कपोत
4. चतुश्र व तिश्र जाति हस्तक्रिया- ३ लयींत
5. व्याख्या - अडवू, लय, नृत्त, नृत्य, नाट्य

---

## सम्युक्त हस्तभेद

संयुतहस्ताः

अञ्जलिश्च कपोतश्च कर्कटः स्वस्तिकस्तथा ॥ १७२ ॥
डोलाहस्तः पुष्पपुट उत्सङ्गः शिवलिङ्गकः ।
फटकावर्धनश्चैव कर्तरीस्वस्तिकस्तथा ॥ १७३ ॥
शकटं शङ्खचक्र च सम्पुटः पाशकीलकौ ।
मत्स्यः कूर्मो वराहश्च गरुडो नागबन्धकः ॥ १७४ ॥
खटू। भेरुण्ड इत्येते संख्याता संयुताः कराः ।
त्रयाविशतितिरित्युक्ताः पूर्वगैर्भरतादिभिः ॥ १७५ ॥

नमस्कार, पक्षी, खेकडा, (स्वस्तिक), (डोला), फुलांची ओंजळ, आलिंगन, शिवलिंग, साखळीचे वाढते दुवे, कात्रीच्या पात्यांचे स्वस्तिक, रथ, शंख, चक्र, छोटी डबी, बंध, खिळा, मासा, कासव, डुक्कर (वराह अवतार), मोठा पक्षी (गरूड), सर्पांची जोडी, खाट, एक प्रकारचा पक्षी

## दृष्टि भेद:

सममालोकितं साची प्रालोकित निमीलिते ।
उल्लोकितानुवृत्ते च तथा चैवावलोकितम् ॥६६॥
इत्यष्टौ दृष्टिभेदाः स्युः कीर्तिताः पूर्वसूरिभिः ।

| | |
|---|---|
| समम- समोर पाहणे | आलोकितम्- वर्तुळाकार (सभोवार) पाहणे |
| साची- शिर न हलवता एका बाजूला पाहणे | प्रालोकितम्- शिर न हलवता दोन्ही बाजूंना पाहणे |
| निमिलिते- खाली पाहणे | उल्लोकितम्- वर पाहणे |
| अनुवृत्तम्- वर-खाली पाहणे | अवलोकितम्- खाली निरखून पाहणे |

## ग्रीवा भेद:

सुन्दरी च तिरवीना तथैव परिवर्तिता ॥ ७९ ॥
प्रकम्पिता च भावज्ञ ज्ञेया ग्रीवा चतुर्विधा ॥
सुंदरीश्च – मानेची दोन्ही बाजूंकडे हालचाल
तिरश्चीना– मानेची 8 या आकारात हालचाल
परिवर्तिता– मानेची अर्धवर्तुळाकार हालचाल
प्रकम्पिता– मानेची पुढे मागे हालचाल (कोंबड्याप्रमाणे)

## स्थानक मंडलभेद:

स्थानकभेदाः
पादविन्यासभेदेन स्थानकां षड्विधं भवेत् ।
समपादं चैकपादं नागबन्दधस्ततः परम् ।।२७४।।
ऐन्द्रं च गारुडं चैव ब्रह्मस्थानमिति क्रमात् ।
समपादम्: दोन्ही पाऊले जुळवून उभे राहणे

एकपादम्ः एका पायावर उभे राहून जो पाय उचलला आहे तो पाय जमिनीवर ठेवलेल्या पायाच्या गुडघ्यावर ठेवणे.

नागबंधम्ः एका पायाने दुसऱ्या पायाला व त्याच पद्धतीने एका हाताने दुसऱ्या हाताला विळखा घालणे

ऐंद्रम्ः अरमंडीमध्ये बसून एक पाय उचलणे व तो दुसऱ्या पायाच्या गुडघ्यावर ठेवणे.

गारुडम्ः उजवा पाय पुढे नेऊन गुडघ्यात वाकवणे व डावा पाय मागे नेऊन चवडा टेकवणे.

ब्रह्मस्थानम्ः पद्मासनात बसणे

## हस्त प्रचार

उत्ताल, अधस्तल, तीर्यक, उर्ध्व, अधोमुख ऐव च ।।
हस्त प्रचार विज्ञेयं नाट्ये नृत्ये च पंच दा ।।

## विनियोग–

### १. पताक हस्त विनियोग

विनियोगः

नाट्यारम्ये वारिवाहे वने वस्तुनिषेधने ।
कुचस्थले निशायां च नद्याममरमण्डले ।।९४।।
तरङ्गेखण्डने वायौ शयने गमनोद्यमे।
प्रतापे च प्रसादे च चन्द्रिकायां घनातपे ।।९५।।
कवाटपाटने सप्तविभक्तयर्थे तरङ्गके ।
वीथिप्रवेशभावेऽपि समत्वे चाङ्गरागके ।।९६।।
आत्मार्थे शपथे चापि तूष्णींभावनिदर्शने ।
तालपत्रे च खेटे च द्रव्यादिस्पर्शने तथा ।।९७।।
आशीर्वादक्रियायां च नृपश्रेष्ठस्य भावने ।
तत्र तत्रेति वचने सिन्धौ तु सुकृतिक्रमे ।।९८ ।।
सम्बोधने पुरोगेऽपि खड्गरुपस्यधारणे ।
मासे संवत्सरे वर्षे दिने सम्मार्जने तथा ।।९९।।
एवमर्थेषु युज्यन्ते पताकहस्तभावनाः ।

| | |
|---|---|
| नाट्यारम्भे | नृत्याचा आरंभ |
| वारिवाहे | ढग |
| वने | जंगल |
| वस्तुनिषेधने | नकार देणे |
| कुचस्थले | छाती |
| निशायाम् | रात्र |
| नद्याम् | नदी |
| अमरमंडले | स्वर्ग |
| तुरंगे | घोडा |
| खंडने | कापणे |
| वायौ | वारा |
| शयने | झोपणे |
| गमनोद्यमे | चालणे |
| प्रतापे | शक्तीप्रदर्शन करणे |
| प्रसादे | प्रसाद देणे- घेणे |
| चंद्रिका | चंद्राचा प्रकाश |
| घनातपे | प्रखर ऊन |
| कवाटपाटने | दरवाजा उघडणे-बंद करणे |
| सप्तविभक्त्यर्थे | च्या आत |
| तरंगके | पाण्यावरचे तरंग |
| वीथिप्रवेशभावेपि | प्रवेश करणे |
| समत्वे | समानता |
| अंगरागके | अंगाला चंदन लावणे |
| आत्मार्थे | स्वतः |
| शपथे | शपथ घेणे |

| | |
|---|---|
| तूष्णींभाव निदर्शने | शांतता |
| तालपत्रे | ताडपत्री (पपायरसचा कागद) |
| खेटे | ढाल |
| द्रव्यादी स्पर्शने | वस्तूंना स्पर्श करणे |
| आशीर्वाद क्रियायाम् | आशीर्वाद देणे |
| नृपश्रेष्ठस्य भावने | श्रेष्ठ राजा |
| यत्रतत्रेति वचने | हे किंवा ते दर्शवणे |
| सिन्धौ | समुद्र |
| सुकृति क्रमे | उत्तम |
| संबोधने | संबोधणे |
| पुरोगेपिPurogaipae | पुढे जाणे |
| खड्गरूपस्य धारणे | तलवार घेणे |
| मासे | महिना |
| संवत्सरे | वर्ष |
| वर्षादिने | पाऊस |
| संमार्जने | अंगण सारवणे |

## २. त्रिपताक हस्त विनियोग

मकुटे वृक्षभावेषु वज्र तद्धरवासवे ।
केतकीकुसुमे दीपे वह्निज्वाला विजुम्भने ॥१०१॥
कपोते पत्रलेखायां बाणार्थे परिवर्तने ।
युज्यते त्रिपताकोऽयं कथितो भरतोत्तमैः ॥१०२॥

| | |
|---|---|
| मुकुटे | मुकुट |
| वृक्ष | झाड |
| वज्रे | वज्र(इंद्राचे शस्त्र) |
| तद्धरवासवे | इंद्रदेव |
| केतकी कुसुमे | (केवड्याचे फूल) |
| दीपे | दिवा |

| | |
|---|---|
| वन्हिज्वाला विजृम्भने | आगीच्या ज्वाळा |
| कपोते | पक्षी |
| पत्रलेखायाम् | चेहऱ्यावर नक्षी काढणे |
| बाणार्थे | बाण |
| परिवर्तने | चक्कर घेणे |

### ३. अंजलि हस्त विनियोग

देवतागुरुविप्राणां नमस्कारेष्वनुक्रमात् ॥१७६॥
कार्यः शिरोमुखोरस्थो विनियोगेऽञ्जलिर्बुधैः।

देव, गुरू व ब्राम्हण यांना नमस्कार करण्यासाठी अनुक्रमे डोक्यावर, कपाळावर व छातीवर अंजली हस्त वापरला जातो.

### ४. कपोत हस्त विनियोग

प्रणामे गुरुसम्भाषे विनयाङ्गीकृतेष्वयम् ।

नमस्कार करण्यासाठी, गुरूंसमोर उभे राहताना, स्वीकार करण्यासाठी किंवा मान्यता दर्शवण्यासाठी कपोत हस्त वापरला जातो.

---

## अडवु

अडवू हे भरतनाट्यममधील मूलभूत पदन्यास आहेत. 'नृत्यातील सर्वात लहान तालबद्ध घटक' अशी अडवूची व्याख्या करता येईल; हे घटक विशिष्ट लयीत केले जातात व विविध शारीरिक हालचालींतून नृत्तमिर्मिती करतात.

## लय

लय हा तालाचा आत्मा आहे. दोन हालचालींमधील वेळेचे समान अंतर म्हणजे लय. साधारणतः अडवू हे तीन लयींमध्ये केले जातात- विलंबित, मध्य, द्रुत. विलंबित लयीच्या दुप्पट मध्यलय व मध्यलयीच्या दुप्पट द्रुत लय असते.

## नाट्य

नाट्यं तन्नाटकं चैव पूज्यं पूर्वकथायुतम् ।।

नाट्यामधून अभिव्यक्ती केली जाते, म्हणजे भाव व्यक्त केले जातात. साहित्य, संगीत व नृत्य यांच्यासोबत केलेले भावात्मक सादरीकरण म्हणजे नाट्य होय. नाट्य सादर करताना, पदन्यास किंवा अडवू केले जात नाहीत. विविध भाव, पात्र, मनोवस्था इत्यादींचे नाट्यातून सादरीकरण होते. उदा. वर्णम्, पदम् इ.

## नृत्त

भावाभिनयहीनं तु नृत्यमित्याभिधीयते ।।१५।।

तालबद्ध अशा मूलभूत पदन्यासाला नृत्त असे म्हणतात. नृत्तामधील हालचालींतून कोणताही भाव व्यक्त होत नाही. केवळ शारीरिक विक्षेपांनी अवकाशात वेगवेगळे आकार निर्माण करणे, एवढाच नृत्ताचा हेतू असतो. अडवू, तसेच अडवूंच्या एकत्र गुंफण्यातून तयार होणारे जति, कोरवई, अलारिपू, जतिस्वरम्, तिल्लाना ही नृत्ताची उदाहरणे आहेत. सौंदर्यपूर्ण हालचाली करून नृत्ताद्वारे परमोच्च आनंदाची अभिव्यक्ती केली जाते.

## नृत्य

रसभाव्यञ्जनादियुक्तं नृत्तभितीर्यते ।।

जेव्हा नृत्तासोबत अभिनय केला जातो, तेव्हा त्यास नृत्य म्हणतात. नृत्यातून पदन्यासाच्या सोबतीने विशिष्ट भाव प्रकट केला जातो. काही विशिष्ट अडवू व तट्टीमेट्टी यांच्या जोडीने गाण्यातील साहित्यावर अभिनय केला जातो. कौतुकम्, शब्दम् ही नृत्य रचनांची काही उदाहरणे आहेत.